।। अल्पारंभः क्षेमकरः।।

**SWS Financial Solutions Pvt. Ltd.**

Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle,
Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013

# गवाक्ष

......एक विचारमंच ! आर्थिक साक्षरतेसाठी

AMFI नोंदणीकत म्यच्यअल फंड वितरकः ARN- ९०७४६


## डिसेंबर २०२४: आर्थिक गुंतवणूक.. सर्वांसाठीच फलदायी !





**श्री. दिपक कुलकर्णी,**
**व्यवस्थापकीय संचालक**



### भयापासून ..भाग्यापर्यंत: आर्थिक गुंतवणूक

आपण समाजमाध्यमांद्वारे चित्रित सत्य बघत आहोत की इक्विटी गुंतवणुकीद्वारे एक मोठा वर्ग वाढत्या निर्देशकाच्या लाटेवर स्वार होत अधिक श्रीमंत होत आहे (सुखवस्तू वर्ग) तर मध्यमवर्गीय आणि त्याखालील वर्ग (वंचित वर्ग) मात्र या गुंतवणुक माध्यमापासून अंतर ठेवल्यामुळे अधिक गरीब होतो आहे. म्हणजे या दोन वर्गातली आर्थिक दरी दिवसेंदिवस रुंदावत आहे. हे चित्र असे का आहे याचा कधी विचार केला आहे का? याचे उत्तर इक्विटी गुंतवणुक माध्यमाविषयी जनसामान्यांना भीती, गैरसमज आणि या विषयात असणारी निरक्षरता यामध्ये दडलेले दिसते.

**रिॲलिटी चेक:** असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया अर्थात **AMFI** ने ऑक्टोबर २०२४ मध्ये जाहीर केलेल्या आकडेवारीतून हे स्पष्ट होते की या महीन्यामध्ये पहिल्यांदाच SIP गुंतवणुक माध्यमातून झालेल्या रक्कमेने ₹ २५,००० कोटीचा आकडा ओलांडला. नवीन ६३.७ लाख SIP अकाउंट्सची नोंदणी झाली. याचाच अर्थ असा की अधिकाधिक लोक हे म्युच्युअल फन्ड्सच्या माध्यमातून इक्विटी गुंतवणुकीकडे वळत आहेत. गुंतवणुकदारांची अधिक विस्तुतपणे माहिती घेतल्यास लक्षात येते की साधारण सुखवस्तू वर्गच या माध्यमाकडे आकर्षित होत आहे. आणि वंचित वर्ग मात्र या आर्थिक लाभदायी माध्यमापासून दूरच रहातो आहे. हे असे का आहे याची जरा कारणमीमांसा करूयात.

**आर्थिक चक्र कसे फिरते आहे?** श्रीमंत किंवा उच्च मध्यमवर्गीय वर्गाला त्यांच्या इक्विटी गुंतवणुकीद्वारे चांगला परतवा मिळतो आहे. म्युच्युअल फन्ड्स परताव्याचे गेल्या १० वर्षांचे आकडे पाहिले तर असे दिसते की गुंतवणूकदारांना सरासरी १५% पेक्षा जास्त परतावा मिळालेला आहे. आर्थिक सुबत्तेमुळे या वर्गाची क्रयशक्ती वाढते आहे. त्याचा परिणाम बाजारात आर्थिक उलाढाल वाढण्यात होतो. परिणामतः महागाई वाढते. वाढलेल्या महागाईशी सामना करण्यासाठी सुखवस्तू वर्गाकडे गुंतवणूक परताव्यातून मिळालेली संपत्ती हाताशी असते. मात्र वंचित वर्ग बऱ्याचदा आहेच त्याच परिस्थितीत राहतो कारण हा वर्ग मुदत ठेवी किंवा बचत खात्यांसारख्या मर्यादित वाढ देणाऱ्या पारंपारिक बचत माध्यमांनाच आपले मानतो. वाढलेल्या महागाईशी सामना करता करता या वर्गाचा आर्थिक कणा मोडकळीस येतो. या चक्रामुळे सुखवस्तू वर्ग अधिक श्रीमंत होतो आणि वंचित वर्ग अधिक आर्थिक उतरणीकडे लागलेला दिसतो. आणि हे आर्थिक चक्र वर्षोनुवर्षे असेच फिरते आहे. या दोन वर्गातील आर्थिक दरी रुंदावतच आहे.






**हे चक्र भेदायचा असेल तर काय करता येईल?**


**१. इक्विटी गुंतवणुक माध्यमाविषयीचे भय टाळा**: बरेच जणांना इक्विटी/शेअर मार्केट हे खास श्रीमंत आणि उच्चशिक्षित वर्गासाठी बनविले गेलेले गुंतवणुकीचे माध्यम वाटते. परंतु मूलभूत समज आणि शिस्तबद्ध दृष्टीकोन असलेली कोणतीही व्यक्ती म्युच्युअल फंडच्या माध्यमातून शेअर बाजारात गुंतवणूक करून आपली संपत्ती वृद्धिंगत करू शकते. योग्य आर्थिक सल्लागाराची मदत घेऊन या माध्यमाविषयी माहिती करून घेतलीच पाहिजे.

**२. मानसिकता बदला:** केवळ बचत न करता गुंतवणूक करण्याची मानसिकता सर्वांनीच अंगीकारली पाहिजे. आपल्या गुंतवणूक परताव्याचा टक्का जर महागाईच्या वाढीपेक्षा जास्त असेल तरच आपण वाढत्या महागाईचा सामना करण्यास समर्थ होत जातो. तेव्हा ही समर्थता आपल्याला देणाऱ्या गुंतवणूक माध्यमांना स्वीकारले पाहिजे.

**३. लहान सुरुवात करा:** तुम्हाला सोयीस्कर असलेल्या रकमेपासून तुम्ही गुंतवणुकीची सुरुवात करु शकता. थेट शेअर मार्केटमध्ये सुलभतेने गुंतवणुक करण्याचा म्युच्युअल फंड हा एक उत्तम मार्ग आहे. एकरकमी किंवा SIP गुंतवणुकीची सुरुवात तुम्ही जितक्या लवकर कराल, तितका चक्रवाढ व्याजाचा फायदा अधिक मिळवू शकता. ही सुरुवात अगदी १०० रु. पासूनही करता येते. ही गुंतवणूक प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आहे.

**४. दीर्घकालीन विचार करा:** चक्रवाढीची जादू कालांतराने आश्चर्यकारक कार्य करते. तेव्हा मार्केट मधील चढउतरांना न घाबरता आपला दीर्घकालीन दृष्टिकोन कायम ठेवणे जरुरी आहे. डे ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करणे कदाचित रोमांचकरी वाटू शकते, परंतु हा एक उच्च-जोखीम असलेला मार्ग आहे ज्यात बहुतेक व्यक्तींचे खराब निर्णय घेतल्यामुळे नुकसान होते. झटपट नफ्यावर जुगार खेळण्याऐवजी, म्युच्युअल फंडासारख्या पद्धतशीर आणि शिस्तबद्ध गुंतवणुकीवर लक्ष केंद्रित करा, जे स्थिर, दीर्घकालीन वाढीसाठी संरचित केलेले आहेत.

**भयापासून भाग्यापर्यंत:** तेव्हा वाचकहो, संपत्ती निर्मिती ही एक मॅरेथॉन आहे, स्प्रिंट नाही. आर्थिक यशाच्या आणि भाग्याचा प्रवासात भयाला मागे टाका. त्याची जागा अभ्यासूवृत्ती आणि जिज्ञासा यांनी घेऊ देत. लक्षात ठेवायला हवे की म्युच्युअल फंड हे केवळ सुखवस्तू वर्गासाठीच नव्हे तर प्रत्येकासाठीच सुलभ, सुव्यवस्थापित आणि फायदेशीर असे गुंतणवूक माध्यम आहे. प्रस्तुत गुंतवणूक माध्यमाचा परतावा बघता संयम आणि चिकाटी नेहमीच जिंकत आलेली आहे याला इतिहास साक्ष आहे. ज्ञान आणि कृतीने स्वतःला सक्षम बनवून आर्थिक विषमतेची साखळी खंडित करूया. लक्षात ठेवा, गुंतवणूक सुरू करण्याची सर्वोत्तम वेळ काल होती. **दुसरी-उत्तम वेळ आज आहे!**



## प्रगतीचे पाऊल पडते पुढे : इंदिरा नगर शाखेचा शुभारंभ



**श्री. राजमल जैन,**
**शाखा प्रमुख,**
**इंदिरा नगर,नासिक**

SWS ने सर्व आर्थिक सेवा एकाच छताखाली पुरवण्याची गरज ओळखून १९९५ साली आपला प्रवास सुरू केला. आज हा प्रवास सुरु होऊन तीन दशके होत आली आहेत. उत्तम, पारदर्शी आणि ग्राहकांच्या संपूर्ण हितासाठी निःपक्षपाती आर्थिक गुंतवणूक, सल्ला आणि सेवा क्षेत्रात व्यावसायिक उत्कृष्टता जोपासत संस्थेचे कार्य नासिक मुख्यालयाबरोबरच पुणे, मुंबई, नागपूर, वर्धा या शाखांमधूनही सुरु आहे. व्यवसायिक कौशल्ये उंचावत प्रगतीशील राहणे ही SWS ची संस्कृती! याच प्रगतीपथावर राहून डिसेम्बर २०२४ पासून आपल्या नाशिकमधील इंदिरा नगर शाखेचा शुभारंभ करतांना आनंद वाटतो आहे. ही शाखा आमचे सहयोगी श्री. राजमलजी जैन यांच्या नेतृत्वाखाली सुरु होत आहे.

मेकॅनिकल इंजिनीरिंगमध्ये पदव्युत्तर शैक्षणिक पार्श्वभूमी असणाऱ्या श्री, जैन यांचा मेकॅनिकल उद्योग क्षेत्रात तसेच अभियांत्रिकी शैक्षणिक क्षेत्रात अध्यापनाचाही समृद्ध असा अनुभव आहे. म्युच्युअल फंड्सच्या वितरणासाठी आवश्यक असणारे AMFI पुरस्कृत आर्थिक कौशल्य त्यांनी प्राप्त केलेले आहे. गेल्या सहा वर्षांपासून SWS च्या माध्यमातून ग्राहकांच्या आर्थिक नियोजन प्रक्रियेमध्ये ते सक्रियपणे सहभागी आहेत. ग्राहकांना योग्य गुंतवणूक धोरणे आणि सल्ला प्रदान करून संबधित सेवा तत्परतेने देणे यात त्यांची कार्यक्षमता कौतुकास्पद आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली SWS इंदिरा नगर शाखा सुरु करतांना आम्हाला आनंद होतो आहे. त्यांच्या कौशल्ये आणि सेवांविषयी विषयी आपल्या काही ग्राहकांचा अभिप्रायच बोलका आहे. तोही जरूर वाचा!

## ग्राहकांचे अभिप्राय / मनोगत



**Mrs. Pratibha Chavan**

I have been associated with SWS for the past 10 years, and I can confidently say that their expertise and guidance have been invaluable to me. From retirement planning to investment strategies, they take the time to understand my goals and tailor their advice to meet my unique financial needs. SWS is always patient, transparent, and proactive, ensuring I feel confident about my financial decisions. Thanks to their support, I've been able to make more informed choices and feel much more secure about my financial future. I highly recommend their services to anyone looking for personalized, professional financial advice.



**Mr. Tejas Sanklecha**

I've been Associated with SWS through Mr. R. S. Jain for the past 4 years, and they've completely transformed my financial strategy. Their team took the time to understand my goals and provided tailored advice that helped me maximize my investments. Thanks to their expertise, I've seen significant growth in my portfolio and feel more confident about my financial future.



**Prof.Nilesh Hyalij**

SWS team is very knowledgeable, responsive and client focused. I have been associated with them through Mr. Rjmaljee Jain. They are having all financial solutions which everyone needs. They are focusing on long term solution like childrens education, retirement planning. After having my financial plan made by SWS team, I am very much satisfied and taking a good sleep everyday without worries!

## ग्राहकांचे अभिप्राय / मनोगत



**Prof. Sandip Patil**

I am investing in mutual funds since 2016 with the advice of SWS. Mr. R.S. Jain, Mr. Upendra Wagh and other team members @ SWS. They keep updating me about my portfolio status from time to time. I did not know anything about stock market, mutual funds, financial planning. But SWS team has suggested proper asset allocation to my funds. The team is responsive, knowledgeable and cooperative.

## आमच्या बद्दल थोडेसे...

**सेवा:**

- आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर ( जन्म, शिक्षण, विवाह, सेवानिवृत्ती,वारसाहक्क इ.) आवश्यक असणाऱ्या गुंतवणूक सेवा: म्युच्यअल फंड्स, इक्विटी मार्केट, कॉर्पोरेट फिक्सड डिपॉसिट्स इ. च्या माध्यमातून
- जीवन विमा, वाहन, आरोग्य आणि अपघात विमा
- करनियोजन आणि कर्ज सेवा. व्यवसाय किंवा इतर विशिष्ट हेतूं संदर्भात आर्थिक गुंतवणूक सल्ला, सेवा

**वैशिट्ये:**

- ३० वर्षांचा प्रदीर्घ, संपन्न अनुभव, सेबी अधिकृत गुंतवणूक सल्लागार, AMFI नोंदणीकृत म्युच्युअल फंड वितरक
- CFA, CFP सारखी प्रमाणित शैक्षणिक पातळी आणि इंजिनीअरिंग, चार्टर्ड अकौंटन्सीसारखी पार्श्वभूमी असणारी अनुभवी आणि कार्यक्षम सल्लागारांची टीम
- विश्वासार्ह आणि निःपक्षपाती सल्ला. वैयक्तिक संपूर्ण कौटूम्बिक, व्यवसाय, विश्वस्थ संस्था यांना सेवा देण्याचा अनुभव
- सोपा, ग्राहकाभिमुख, पारदर्शी आणि नैतिक व्यवहार
- पुणे, मुंबई , नागपूर, वर्धा, कोल्हापूर आणि इतर उदोयन्मुख शाखा

व्यावसायिक संस्थेच्या सर्व समाजोपयोगी कार्याला अधिक संघटितरित्या आणि परिणामकारक स्वरूपात पुढे न्यावे हा विचार करून, २०१८ मध्ये 'अप्लारंभा एज्युकेशनल अँड कल्चरल फाउंडेशन' चा उदय झाला. समाजावर प्राथमिक परिणाम करणारी, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्र ही प्रामुख्याने विचारात घेतली गेली. या दोन्ही विषयांच्या कक्षेत कार्य करतांना, त्यातील विविध निकडी ओळखून, त्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना मदत करणे आणि समाजामध्ये अर्थ साक्षरता वाढावी यासाठी कार्य करणे ही अप्लारंभाचे प्राथमिक उद्दिष्ट्ये आहेत. अधिक माहिती: www.alparambha.com. ब्लॉग : https://alparambha.wordpress.com/

---

॥ अल्पारंभः क्षेमकरः ॥

**SWS Financial Solutions Pvt. Ltd.**

Comprehensive Financial Consultancy & Services

AMFI नोंदणीकृत म्युच्युअल फंड वितरक: ARN-९०७४६
मुख्य कार्यालय: दुसरा मजला, मंडलिक प्राईड, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक १३.
संपर्क: ०२५३-२ ९७५ ९७५ / ७५०७८ ८४४७७

www.swsfspl.com https://swsfspl.blogspot.com

**इंदिरा नगर -नासिक**
श्री. राजमल जैन
संपर्क: ८९७५३ ९३९४१
rsjain8162@gmail.com

**पुणे**
श्री. स्वप्नील एकांडे
संपर्क: ९८२८७३५०५५ / ७७२००९९२४१
swapnil@swsfspl.com

**मुंबई**
श्री. किशोर काळे
संपर्क: ९८६९२३९९४० / ९२२४४३३१२२
kishor@swsfspl.com

**नागपूर**
श्री नीरज अडबे
संपर्क: ८३०८८३३७२४
neeraj@swsfspl.com